महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जा.क्र. तंशिविकापु/विवि १/२०२०/१५३३ दिनांक ०५/०५/२०२०

परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संचालक,
पुणे विभागीय कार्यालयाचे अधिनस्त,
**पुणे महानगर पालिका (P.M.C) व पिंपरी चिंचवड महानगर पालिका (P.C.M.C)**
यामधील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था व कार्यालय.

विषय :- महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉक डाऊनच्या कालावधीतील मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र (M.M.R), पुणे महानगर पालिका (P.M.C),मालेगांव महानगर पालिका तसेच पिंपरी चिंचवड महानगर पालिका (P.C.M.C) यांच्या कार्यक्षेत्रातील राज्य शासकीय कार्यालयातील उपस्थिती व अन्य उपाययोजनांबाबत.

संदर्भ : - ०१.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र.व.का.) दिनांक ०४ मे २०२०.
०२.तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४/आस्था/वित्तीय उपाययोजना/२०२०/२०७, दिनांक ०५ मे २०२०.

कोरोना विषाणूचा (कोविड १९) प्रसार राज्य शासकीय कार्यालयामध्ये होवू नये तसेच राज्यातील अधिकारी/कर्मचारी यांना त्याचा संसर्ग होवू नये म्हणून, प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या दृष्टीने सामान्य प्रशासन विभागाच्या विविध शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार संदर्भ क्रमांक ०१ शासन निर्णयान्वये शासकीय कार्यालयातील उपस्थितीबाबत व अन्य उपाययोजनाबाबत सुधारित आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. (सोबत सुलभ संदर्भासाठी शासन निर्णयाची प्रत जोडण्यात आलेली आहे).

तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी सदंर्भिय क्रमांक ०२ च्या पत्रानुसार दिलेल्या निर्देशानुसार सदर शासन निर्णय आपल्या अवलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी तातडीने अग्रेषित करण्यात येत आहे. तरी या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त पुणे महानगर पालिका (**P.M.C**) व पिंपरी चिंचवड महानगर पालिका (**P.C.M.C**) यामधील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांनी तसेच शासकीय कार्यालयांनी शासन निर्णयात नमुद सुचना व उपाययोजनाबाबत तातडीने कार्यवाही करावी.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

प्रत - मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग मुंबई ४०० ००१ यांना माहितीस्तव सादर.